# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/02/2024 (गुरूवार) दुपार

## पोस्टे सावनेर हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू विक्री करणाऱ्या इसमांवर कायदेशिर कारवाई

मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. १४/०२/२०२४ रोजी धापेवाडा बाजारचौक वार्ड क्र. ३, धापेवाडा वार्ड क्र. ४, पाटनसावंगी ता. सावनेर येथे मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०४ आरोपी हे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू बाळगून विक्री करतांना मिळून आल्याने त्यांचे ताब्यातून मोहाफुल दारू एकुण ६० लिटर मोहाफुल गावठी दारू प्रति लिटर ५०/— रू प्रमाणे एकुण ३०००/— रू चा मुद्देमाल मिळून आल्याने नष्ट करण्यात आला. **०२ महिला आरोपी व १) सुरेश डोमाजी मने वय ६० वर्ष रा. वार्ड क्र. ०१ पाटनसावगी ता. सावनेर २) किरण अशोक हरकडे वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. ०४ धापेवाडा ता. कळमेश्वर** यांचे विरुद्ध पो.स्टे सावनेर येथे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर ठाणेदार पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकटेश दोनोडे सहायक फौजदार राजेंद्र यादव, सुरेंद्र वासनिक, पोहवा संतोष बैरागी, पोहवा नागोसे, रविंद्र चटप यांचे पथकाने पार पाडली.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
## नागपूर ग्रामीणची कारवाई

पो.स्टे. कुही :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा आकोली येथे दिनांक १३/०२/२०२४ चे २३.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ मौजा आकोली परिसरात पेट्रोलींग करित असतांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की पाचगावकडे १० चक्का टिप्पर येत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून पाचगावकडे जाणाऱ्या आकोली रोडवर नाकाबंदी केली असता १० चक्का टिप्पर क्र. एम. एच.— ४०/ बी एफ ४८२४ येतांना दिसले त्यास त्यांचे नाव गाव विचारले असता **आरोपी नामे— १) दर्शन शंभुजी रामटेके, वय २१ वर्ष रा. पाचगाव ता. उमरेड, २) अनुराग राजकुमार पंढरे वय १९ वर्ष रा. नवेगाव ता. उमरेड** असे सांगितले. सदर वाहन चेक केले असता त्यामध्ये विना परवाना रेती दिसुन आली. कोणत्याही प्रकारचा परवाना मिळुन आला नाही. त्यामुळे त्यांच्या ताब्यातुन १० चक्का टिप्पर क्र. एम एच —४०/बी एफ ४८२४ किंमती ३०,००,०००/— रू. व ताब्यात घेतलेले टिप्पर मधील विना परवाना ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रू असा एकुण ३०,३०,०००/—रू. चा माल जप्त करण्यात आला व गुन्हा दाखल करून तपासात घेतला सदर आरोपीतांना अटक करण्यात आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस अंमलदार राहुल देविकर, पोस्टे कुही यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. कुही येथे आरोपींविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवी सहकलम ४८(८), ४७ महा.जमीन महसुल संहिता, सहकलम

४,२१ खाण आणी खनिज अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार हरीदास चाचरकर हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्री. राजा पवार, पोस्टे कुही येथील ठाणेदार श्री. सपोनि अमितकुमार आत्राम, पोस्टे कुही पोलीस हवालदार हरीदास चाचरकर यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**